**-: प्रेस नोट :-** **दिनांक :- १६/०४/२०१९**

**हरविलेल्या ०२ वर्षाच्या मुलाच्या पालकांचा तात्काळ शोध घेऊन सुखरुप पालकांच्या ताब्यात दिला.**

आज दिनांक १६/४/२०१९ रोजी सकाळी ११/३२ वा.च्या सुमारास कोंढवा मार्शल कर्मचारी पो.शि. मुल्ला व पो.शि. दाभाडे यांना पोलीस नियंत्रण कक्षाकडून माहीती मिळाली की एक लहान मुलगा सापडलयाची माहीती मिळाली. त्याप्रमाणे कोंढवा पोलीसांनी तात्काळ कॉलप्रमाणे जाऊन खात्री केली असता ०२ वर्षाचा मुलगा घाबरलेल्या अवस्थेत रडत असताना मिळून आला. त्याला काहीही सांगता येत नव्हते.

कोंढवा मार्शल वरिल कर्मचारी यांनी त्यास घेऊन २ ते ३ सोसायटयांमध्ये फिरुन प्रत्येक फ्लॅटवर जाऊन त्यांचे पालकांचा शोध घेतला असता त्याचे पालक मिळत नव्हते. तसेच मुलगा लहान असल्याने त्याला काहीही सांगता येत नव्हते.सदर मुलाचे पालाकांचा शोध घेत असताना तो गिरमे हाईटस सोसायटी साळुंके विहार रोड पुणे येथे रहाणारे इसम नामे असगर खान यांचा असल्याचे समजले त्याचे वय २ वर्षे असल्याचे समजले तो खेळत खेळत सोसायटीच्या आवारातून रस्त्यावर गेला होता. व तो चुकला होता.

पोलीसांच्या प्रयत्नांमुळे व नागरीकांच्या सतर्कतेमुळे सदर लहान मुलास त्याचे पालकांच्या ताब्यात दिले आहे. नातेवाईकांनी व पालकांनी पोलीसांचे आणी नागरीकांचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी कोंढवा मार्शल कर्तव्य करणारे कर्मचारी पोशि.मुल्ला व पोशि. दाभाडे यांनी उत्तम कामगिरी केली आहे.



**(अनिल पाटील)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पो.स्टे.पुणे शहर